# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक :
०२०-२५६०१२०६
२५६०१२०१
२५६०१२०२
फॅक्स : ०२०-२५६९१३४१

परीक्षा नियंत्रक कार्यालय
गणेशखिंड, पुणे ४११ ००७

Website : www.unipune.ernet.in
e-mail : coe@unipune.ernet.in

## अत्यंत महत्वाचे

संदर्भ : परीक्षा/पनि/७१ दिनांक : ९ जुलै, २०१०

प्रति,
१. मा.प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये.
२. मा.संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था
३. मा.विभागप्रमुख, विद्यापीठ सर्व शैक्षणिक विभाग

**विषय : संकेतस्थळावर माहिती उपलब्धतेबाबत.**

**महोदय/महोदया,**

विद्यापीठाने यापूर्वीच घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार परीक्षा विभागाविषयीची जास्तीत जास्त माहिती संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून खालील माहिती संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

१. **परीक्षा विषयी अध्यादेश** :- विद्यार्थ्यांच्या निकालासंदर्भात काही अधिकचे गुण देण्याबाबतचे तसेच अन्य विषयासंबंधीचे सर्व अध्यादेश स्वतंत्ररीत्या संकेतस्थळावर ठेवण्यात आलेले आहेत. **(www.unipune.ac.in [Link : Ordinance )**

२. **पूर्वीच्या प्रश्नपत्रिका** :- विद्यार्थ्यांना संदर्भासाठी आधीच्या वर्षाच्या प्रश्नपत्रिका संकेतस्थळावर विद्याशाखानिहाय उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. **(www.unipune.ac.in [Link : Old Question Papers)**

३. **परीक्षा कामकाज पुस्तिका** :- विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेले निर्णय व अन्य परिपत्रके वेळोवेळी महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्थांना कळविण्यात आलेली आहेत. सदर निर्णयांची व परिपत्रकांची एकत्रित पुस्तिका परीक्षा विभागाने तयार केली असून तीही संकेतस्थळावर लवकरच ठेवण्यात येत आहे.

आपणांस विनंती की, वरील पत्राचा आशय सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व इतर सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा.

कळावे,

आपला विश्वासू,

**(डॉ. शि. मो. आहिरे)**
**परीक्षा नियंत्रक**